# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- २४/०३/२०१८

## वणी गावातील मोबाईल दुकान फोडणारे ०२ गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात

---

दिनांक १३ मार्च २०१७ रोजी वणी, ता.दिंडोरी येथील रहिवासी श्री. आशिष इंदरचंद बोरा यांचे वणी गावातील सौभाग्य इलेक्ट्रॉनिक्स दुकानात कोणीतरी अज्ञात चोरटयांनी खिडकीव्दारे आत प्रवेश करून दुकानात विक्रीसाठी ठेवलेले सॅमसंग कंपनीचे ११ मोबाईल स्मार्टफोन घरफोडी चोरी करून नेले होते. सदर **बाबत वणी पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नंबर ४६/२०१८ भादवि कलम ४५४,४५७,३८०** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांचे मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पथकामार्फत सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू होता.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो** यांनी जिल्हयातील वाढते घरफोडी, चोरीचे गुन्हे तसेच मोबाईल दुकानांमध्ये होणारे चोरीचे गुन्हयांचा सविस्तर आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिलेल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी जिल्हयातील मोबाईल दुकाने फोडणारे गुन्हेगारांची गुन्हा करण्याचे पध्दतीवरून मिळविलेल्या गुप्त माहितीचे आधारे, सदर गुन्हयांमधील चोरीस गेलेले मोबाईल हे काही इसम कमी किंमतीचे भावात दिंडोरी तालुक्यातील ग्रामीण भागातच विक्री करत असले बाबत समजले. त्याप्रमाणे दिनांक २३/०३/२०१८ रोजी स्थागुशाचे पथक वणी गावातील लेंडीपुरा परिसरात गस्त घातल असतांना मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी इसम नामे **१) देविदास भास्कर खराटे,** रा. भातोडे, ता.दिंडोरी व **२) सोमनाथ कैलास गायकवाड,** रा.लेंडीपुरा, वणी, ता.दिंडोरी यांना शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले वरील दोन्ही इसमांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता, त्यांनी सुमारे १० ते १२ दिवसांपुर्वी वणी गावातील शिंपी गल्ली परिसरातील सौभाग्य इलेक्ट्रॉनिक्स दुकान फोडल्याची कबुली दिली आहे.

ताब्यात घेतलेले वरील दोन्ही आरोपींची घरझडती घेतली असता त्यांचे कब्जात सॅमसंग जे-७ प्राईम, जे-२ प्राईम, जे-५ प्राईम, जे-७ नेस्ट, जे-७ मॅक्स असे **एकुण १० मोबाईल स्मार्टफोन किं.रू. १,२५,७५०/-** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, पोउनि मच्छिंद्र रणमाळे, पोउनि स्वप्निल नाईक,** पोहवा दिपक आहिरे, दत्तात्रय साबळे, पुंडलीक राउत, गणेश वराडे, पोना अमोल घुगे, पोकॉ विश्वनाथ काकड, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम अशा पथकाने सदर कामगिरी केली आहे.